अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
११.११.२०२६

वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www. waruddarpan.com

9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २८१ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

बजाजनगर हत्याकांडातील मुख्य आरोपीसह पाच जणांना अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नागपूर - पिपळा फाटा येथील तरुण अमन उर्फ बाँबी सुनील सपाटे (२७) याची निघृण हत्या करून त्याच्या कुटुंबियांच्या जीवनात कायमचा अंधार पेरणारा अट्टल गुन्हेगार अक्षय किशोर मडावी (२९) याच्या पोलिसांनी मुसक्या बांधल्या. त्याच्यासह अन्य चार आरोपीनाही पोलिसानी अटक केली.

अक्षय किशोर मडावी (२९, फुटाळा वस्ती), पीयूष महेश नेनवानी (३१, अनुपमा माईन स्टोन, जरीपटका), समीर विजय कावळे (२३, आदिवासीनगर, गि?ट्टीखदान), आदित्य किशोर कळसकर (१९, नवीन फुटाळा) आणि सुजल राजू सिडाम (२१, जुना फुटाळा) अशी आरोपींची नावे आहेत. सोमवारी ९ नोव्हेंबर रोजी मृत अमनचा मित्र प्रसाद राऊत याचा वाढदिवस होता. त्यामुळे रविवारी ८ नोव्हेंबरच्या मध्यरात्री अमन, अक्षय गंगाधर नौकरकर हे वाढदिवसाच्या कार्यक्रमाला जात होते. देवनगर चौकात अमनच्या मित्राने कार उभी केली. तेथे आरोपी कारसमोर फटाके फोडत होते. अमनने फटाके फोडणाऱ्यांना हटकले असता आरोपी अक्षय मडावी व त्याच्या साथीदारांनी अमनला मारहाण कैली तर, मडावीने चाकू काढून अमनच्या पोटात खुपसला. नजिकच्या ऑरेंज सिटी हॉस्पिटलमध्ये त्याला उपचार मिळाले नसल्याने खूप रक्तस्राव झाला आणि मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. ऐन दिवाळीच्या रात्री ही घटना घडल्याने उपराजधानीतील नागरिकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर, बजाजनगरच्या ठाणेदाराला पोलिस आयुक्तांनी तडकाफडकी नियंत्रण कक्षात हलविले. निरपराध बॉबी सपाटेची हत्या केल्यानंतर आरोपी मडावी त्याच्या साथीदारांसह पीयूष नेनवानी याच्या घरी गेला. त्याला खुनाची माहिती दिली.

गंभीर गुन्हा केल्याचे माहित असूनसुद्धा पियुषने आरोपी मडावीच्या लपण्याची आणि पसार होण्याची सोय करून दिली. त्याला जेवण केल्यानंतर रात्रभर आश्रय दिला. मोबाईल, सिम कार्ड देऊन त्याची पळून जाण्याची व्यवस्था केली.

रत्नागिरीत भीषण अग्नीतांडव! अग्निशमन दल आग विझवायला पोहोचलं, पण बंबात पाणीच नाही, रहिवाशांचा संताप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



रत्नागिरी - शहरातील मध्यवर्ती भागात भीषण आगीची घटना घडली आहे. मारुती मंदिर परिसरात असलेल्या गिफ्ट आर्टिकलच्या दुकानाला भीषण आग लागली आहे. या आगीमध्ये दुकानातील सर्व साहित्य जळून खाक झाले असून अद्यापही आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आलेलं नाही. परिणामी आग अजून धुमसत असल्याचे चित्र आहे. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र या भीषण आगीमुळे दुकानातल्या सर्व साहित्य जाळून खाक झाल्याचा अंदाज आहे. तर अडीच तासानंतरही आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन विभागाला यश न आल्याने आता स्थानिकांच्या संतापाचाही भडका उडताना दिसतो आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळाताच अग्नीशमन दलाच्या चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. अग्नीशामक दलाकडून सध्या आग विझवण्याचे शर्तीचे प्रयत्न साध्य सुरु आहे. तर आतापर्यंतच्या माहितीनुसार, सुदैवाने यामध्ये अद्याप तरी मोठी वित्तहानी झाल्याची माहिती नाही. मात्र, आगीवर अजून तरी नियंत्रण मिळवण्यात यश येतांना दिसत नाहीये. दरम्यान घटनेची माहिती मिळताच नगर पंचायतीच्या अग्नीशमन दलाचे बंब ज्यावेळी घटनास्थळी पोहचले त्यावेळी पुरेसे पाणी नव्हतं, अशी माहिती स्थानिकांनी देत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली आहे.

आग लागून तीन तास उलटले, अद्याप आगीवर नियंत्रण मिळवण्यात अपयश अशातच, रत्नागिरी शहरातील गिफ्ट आर्टिकलच्या दुकानाला लागलेल्या या आगीच्या घटनेत रत्नागिरी नगर परिषदेच्या अग्निशमन दलाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. सकाळच्या वेळेला आग लागल्यानंतर बंब दाखल झाले. पण, दोन मजल्याच्या बिल्डिंगला लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवताना रत्नागिरी नगरपरिषदचे बंब अद्यायवत नसल्यामुळे मर्यादा आले. परिणामी तीन तास उलटले, अद्याप आगीवर नियंत्रण मिळवण्यात अपयश आले आहे.

थोडक्यात

मुंबईला लाज आणणारी घटना, के.ई.एम. रुग्णालयातील लिफ्ट बंद



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई - मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयाच्या ऑर्थोपेडिक इमारतीतील लिफ्ट गेल्या आठवडाभरापासून बंद असल्याने रुग्णांचे हाल होत आहेत. फ्रॅक्चरग्रस्त, अपंग, अपघातग्रस्त आणि शस्त्रक्रियेनंतर उपचार घेणाऱ्या रुग्णांना जिन्याने वरच्या मजल्यांवर जावे लागत आहे. काही रुग्णांना व्हीलचेअर आणि स्ट्रेचरच्या मदतीने जिन्यांवरून नेले जात आहे. पायाला प्लॅस्टर केलेला एक रुग्ण शिड्यांवर बसून खाली उतरतानाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर टीकेची झोड उठली आहे.

मंत्री गणेश नाईक यांच्या शासकीय बंगल्याला आग : एसीमधील शॉर्ट सर्किटचा प्राथमिक अंदाज

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




मुंबई - दिवाळीच्या सणात राज्यभरात विविध ठिकाणी आगीच्या दुर्घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. अशातच आता एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर येत आहे. राज्याचे मंत्री गणेश नाईक यांच्या 'पावनगड' या शासकीय बंगल्याला अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात आणि राजकीय वतुर्ळात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सुमारे ४ हजार चौरस फुटांच्या तळमजल्यावरील या बंगल्यात आग वेगाने पसरली होती. अग्निशमन दलाकडून दुपारी १ वाजून ३४ मिनिटांनी मिळालेल्या माहितीनुसार, या भीषण आगीमुळे बंगल्यातील वीजवाहिन्या, विद्युत उपकरणे, स्प्लिट एसी, स्वयंपाकघरातील साहित्य, कार्यालयीन फाइल्स, महत्त्वाची कागदपत्रे, लाकडी व स्टीलचे फर्निचर, फ्रिज आणि फॉल्स सिलिंगचे मोठे नुकसान झाले आहे.

भीषण अपघात : दोघांचा मृत्यू

कोकर्डा फाट्यावर टाटा नेक्सॉनची दुचाकीला जोरदार धडक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



अंजनगाव दर्यापूर - मार्गावरील कोकर्डा फाट्यानजीक ९ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास भीषण अपघात घडला. भरधाव वेगाने जाणाऱ्या टाटा नेक्सॉन चारचाकीने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील एका युवकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर दुसऱ्या युवकाचा अंजनगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. दोघेही मित्र असून नवगाजी प्लॉट परिसरातील रहिवासी असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कार चालक हा एमएच २७ बीझेड १९२४ क्रमांकाची टाटा नेक्सॉन कार घेऊन अंजनगावकडून दर्यापूरकडे जात होता. याचवेळी दर्यापूरकडून अंजनगावकडे दुचाकीने येणारे अब्दुल साकीब अब्दुल सलीम आणि वाहीद खान इसाक खान हे कोकर्डा फाट्यावर आले असता कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेत अब्दुल साकीब अब्दुल सलीम वय वर्षे (१८) नवगज्जी प्लॉट अंजनगाव सुर्जी यांचा जागीच मृत्यू झाला, तर वाहीद खान ईसाक खान वय वर्षे (१९) रा. भालदारपुरा अंजनगाव सुर्जी यांना उपचारासाठी अंजनगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचीही प्राणज्योत मालवली.

दिवाळीच्या सणात अमरावतीत रक्तरंजित घटना

तरुणाला भोसकून संपवलं, अज्ञात आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरु

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



अमरावती - शहरातून एक अतिशय खळबळजनक बातमी समोर आली आहे. दिवाळीच्या सणात अमरावतीत रक्तरंजित घटना घडली आहे. गाडगेनगर हद्दीत तरुणाची चाकूने वार करून हत्या करण्यात आली आहे. अमरावती शहरात दिवाळीचा सण साजरा होत असतानाच गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत तरुणाची धारदार शस्त्राने वार करून हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यातील मृत तरुणाचे नाव राजेंद्र कचरे असे आहे. या घटनेनं शहरात मोठी खळबळउडाली असून सध्या पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, महेंद्र कॉलनी येथील पांढरी हनुमान मैदानावर काही अज्ञात हल्लेखोरांनी निक्कू याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. दरम्यान या घटनेतील आरोपी कोण? याचा तपास सध्या पोलीस करत असून आरोपीला शोधून काढणं पोलिसांपुढचं आव्हान असणार आहे.

आसाममध्ये रेल्वे अपघात! कोलकाता-सैरंग एक्सप्रेसचे इंजिनसह ६ डबे रुळावरून घसरले : सर्व प्रवासी सुरक्षित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



दिगारु - बुधवारी (११ नोव्हेंबर) सकाळी गुवाहाटीजवळील दिगारु रेल्वे स्थानकावर मिझोरमला जाणाऱ्या कोलकाता सैरंग एक्सप्रेसचे इंजिन आणि पाच डबे रुळावरून घसरले.

मिझोरम ते कोलकाता हा नेहमीच प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी हा प्रवास धक्कादायक ठरला. जेव्हा ही घटना घडली तेव्हा ट्रेन कोलकाताहून मिझोरममधील सैरंगकडे जात होती. नॉर्थइस्ट फ्रंटियर रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी के. के. शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी सुमारे ६ वाजून ५४ मिनिटांनी आसाममधील दिगारु रेल्वे स्थानकावर दुसऱ्या गाडीला प्राधान्य देण्यासाठी गाडी क्रमांक १३१२५ कोलकाता - सैरंग एक्सप्रेस थांबवली जात असताना लोको पायलटला वेग नियंत्रित करता आला नाही. यामुळे गाडी रुळावरून खाली घसरण्याची दुर्घटना घडली. यामध्ये इंजिनसह सहा डबे रुळावरून घसरले. सर्व प्रवासी सुरक्षित असून कोणालाही दुखापत झालेली नाही.



दोन्ही राष्ट्रवादींचे एकत्रीकरण आमच्याशिवाय होणार नाही- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : समान नागरी कायदा आणण्यावर सरकार ठाम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणावरून राज्यात पुन्हा राजकीय चर्चांना उधाण आले असताना, या प्रक्रियेबाबत सुरू असलेल्या घडामोडींची माहिती त्या दोन्ही पक्षांचे अध्यक्षच देऊ शकतात. इतर नेत्यांकडून याबाबत केल्या जाणाऱ्या विधानांना काहीही अर्थ नाही. दोन्ही राष्ट्रवादींचे एकत्रीकरण आमच्याशिवाय होणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्याचवेळी राज्यात समान नागरी कायदा लागू करण्याबाबत सरकार ठाम



असून, विरोधकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केल्यास भाजपही त्यांना रस्त्यावर उतरून प्रत्युत्तर देईल, असा इशारा त्यांनी दिला.

पत्रकारांच्या दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमात संवाद साधताना फडणवीस यांनी राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणासह गोकुळ दूध संघाची निवडणूक, दुष्काळमुक्त महाराष्ट्राची योजना, समान नागरी कायदा, दिशा सालियन मृत्यू प्रकरण, महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा आणि महायुती सरकारच्या कामकाजावर भाष्य केले. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाबाबत बोलताना, नेमके काय सुरू आहे हे खासदार शरद पवार किंवा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारच सांगू शकतील. या दोन्ही नेत्यांनी दिलेली माहितीच ग्राह्य धरली पाहिजे. इतर नेते याबाबत काय बोलतात, त्याला काहीही अर्थ नाही, असे फडणवीस यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांची अजित पवार यांच्याशी तुलना करणे अन्यायकारक आहे. त्या सध्या कामकाज शिकत आहेत, तर अजित पवार हे मुरब्बी आणि अनुभवी राजकारणी होते, असेही त्यांनी नमूद केले.

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीवरून सुरू असलेल्या वादाबाबत बोलताना फडणवीस म्हणाले, मी कोणत्याही व्यक्तीच्या नव्हे, तर संस्थेच्या बाजूने उभे राहिलो. गोकुळमध्ये एका गटाचे १३, तर दुसऱ्या गटाचे १२ संचालक असल्याने निर्माण झालेली तांत्रिक कोंडी सोडविण्यासाठी सहकार कायद्यात सुधारणा करण्यात आली. सरकारला या संस्थेवर ताबा मिळवायचा असता, तर तो कधीच मिळिवता आला असता.

राज्य अन्न आयोगाची सरकारला सूचना

पात्र लाभार्थी अन्न सुरक्षेपासून वंचित नको!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेच्या लाभार्थ्यांची पडताळणी करताना एकाच रेशनकार्डवर समाविष्ट असलेल्या कुटुंबातील एखादा सदस्य अपात्र ठरल्यास संपूर्ण कुटुंबाला योजनेच्या लाभापासून वंचित ठेवू नये. प्रत्येक प्रकरणाची प्रत्यक्ष क्षेत्रीय पडताळणी करून पात्र लाभार्थ्यांचा अन्नधान्याचा लाभ कायम ठेवावा, अशी महत्त्वपूर्ण सूचना राज्य अन्न आयोगाने राज्य सरकारला केली आहे तसेच अपात्र ठरवून लाभ बंद केलेल्या नागरिकांपैकी पात्र असलेल्यांचा लाभ तातडीने पूर्ववत करण्यात यावे, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार शिधापत्रिका प्रणालीतील व्यवस्थापन शिधापत्रिकांच्या माहितीची प्राप्तिकर विभाग, केंद्रीय अप्रत्यक्ष कर मंडळ, कॉर्पोरेट



व्यवहार मंत्रालय, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय तसेच पीएम किसान योजनेच्या डेटाबेसशी पडताळणी करण्यात आली आहे. या आधारे अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतून वगळण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, ही कार्यवाही करताना प्रत्येक प्रकरणाची प्रत्यक्ष पडताळणी करावी आणि केवळ संशयाच्या आधारे पात्र लाभार्थ्यांना योजनेपासून वंचित ठेवू नये, असे राज्य सरकारनेही स्पष्ट केले आहे. आयोगाकडे तक्रारी राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी राज्य सरकारला पाठवलेल्या पत्रात या प्रक्रियेतील त्रुटींवर लक्ष वेधले आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी संयुक्त कुटुंब पद्धती असल्याने एकाच शिधापत्रिकेवर दोन किंवा अधिक स्वतंत्र कुटुंबे वास्तव्यास असतात. अशा वेळी कुटुंबातील एखादा सदस्य प्राप्तिकर भरत असल्यास किंवा त्याच्या नावावर चारचाकी वाहन असल्यास संपूर्ण शिधापत्रिकेवरील लाभार्थ्यांना अपात्र ठरवले जात असल्याच्या तक्रारी आयोगाकडे प्राप्त झाल्या आहेत.

मुद्रांक शुल्क अधिभारातून महापालिकांना ४२१ कोटींचे अनुदान

पुणे महापालिकेला सर्वाधिक १०९ कोटी, नाशिकला २१ कोटी २५ लाख रुपये

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – राज्यातील २८ महानगरपालिकांना एक टक्का मुद्रांक शुल्क अधिभारातून जमा होणाऱ्या महसुलापैकी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ४२१ कोटी ७० लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. हे अनुदान बिनशर्त स्वरूपात देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील स्थावर मालमत्तेच्या विक्री,



देणगी आणि फलोपभोग गहाण व्यवहारांवर एक टक्का मुद्रांक शुल्क अधिभार आकारला जातो. या अधिभारातून जमा होणाऱ्या महसुलातून संबंधित महानगरपालिकांना अनुदान दिले जाते. एकूण ४२१ कोटी ७० लाख रुपये अनुदानापैकी पुणे महानगरपालिकेला सर्वाधिक १०९ कोटी ५४ लाख रुपये तर नाशिक महापालिकेला २१ कोटी २५ लाख रुपये मिळणार आहेत.

ठाणे महानगरपालिकेला ९६ कोटी २६ लाख, पिंपरी-चिंचवडला ४७ कोटी ७३ लाख रुपये, नागपूरला १८ कोटी १९ लाख रुपये, नवी मुंबईला १७ कोटी ४७ लाख रुपये आणि वसई-विरारला १७ कोटी ४७ लाख रुपये अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

असे आहे अनुदान

मीरा-भाईंदर पालिकेला १६ कोटी १३ लाख, कल्याण-डोंबिवलीला १७ कोटी १४ लाख, पनवेलला १४ कोटी ३० लाख, अमरावतीला ३ कोटी ६७ लाख, सोलापूरला ४ कोटी ३२ लाख आणि कोल्हापूरला ३ कोटी ४३ लाख रुपये मिळणार आहेत.

सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव (क्विंटलमध्ये)

ज्वारी -	१६५० -	२०००
गहू -	२५०० -	३०००
तूर -	६१०० -	६३९०
मूग -	६५०० -	७०००
उडीद -	६००० -	७०००
हरभरा -	५६०० -	५९००
सोयाबिन -	४१०० -	४३५०
बाजरा -	२००० -	२३००
तिळ -	८२०० -	९३००
भुईमूग -	५१५० -	५३५०
मका -	२२०० -	२३००

गोकुळवर महायुतीचा झेंडा! शासननियुक्त ४ मते ठरली निर्णायक

अध्यक्षपदी राजेश पाटील यांची निवड, सतेज पाटील यांना धक्का

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

कोल्हापूर – गेल्या काही दिवसांपासून गाजत 'गोकुळ' दूध संघाच्या सत्तासंघर्षाचा फैसला अखेर मंगळवारी लागला.

गोकुळच्या अध्यक्षपदी महायुतीचे उमेदवार आणि माजी आमदार राजेश पाटील यांची अधिकृतरित्या निवड झाली. त्यामुळे पुन्हा एकदा गोकुळवर महायुतीचा झेंडा फडकला आहे. निवडणुकीत बहुमत असूनही सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील



समविचारी आघाडीला पराभव पत्करावा लागला.

मंगळवारी पार पडलेल्या अत्यंत चुरशीच्या मतदान प्रक्रियेत राजेश पाटील यांनी १६ मते मिळवत बाजी मारली, तर काँग्रेस नेते सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील समविचारी आघाडीचे उमेदवार शशिकांत पाटील चुयेकर यांना १३ मतांवर समाधान मानावे लागले. विशेष म्हणजे, या निवडणुकीत राज्य शासनाने नियुक्त केलेल्या चार संचालकांची मते विजयासाठी अत्यंत निर्णायक ठरली.

कोल्हापूर जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदासाठी मंगळवारी सकाळी ११ वाजता मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. निवडणूक निर्णय अधिकारी मौसमी चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक पार पडली. महायुतीकडून माजी आमदार राजेश पाटील, तर समविचारी आघाडीकडून शशिकांत पाटील चुयेकर रिंगणात होते. मतदानासाठी महायुतीचे संचालक पिवळे फेटे बांधून आले होते. दोन्ही गटांच्या संचालकांनी मतदान करण्यापूर्वी गोकुळचे शिल्पकार आनंदराव पाटील चुयेकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले.

औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्देशानुसार ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. एकूण २९ सदस्यांनी मतदान केले (२५ निर्वाचित आणि ४ शासन नियुक्त).

न्यायालयाच्या आदेशानुसार, २५ निर्वाचित सदस्यांची मते एका मतपेटीत आणि शासनाने नियुक्त केलेल्या ४ सदस्यांची मते दुसऱ्या स्वतंत्र मतपेटीत सीलबंद ठेवण्यात आली होती. नियमानुसार, २५ निर्वाचित सदस्यांमधून स्पष्ट बहुमत मिळाल्यास ४ सीलबंद मतांची मोजणी होणार नव्हती. मात्र, निकालात शासन नियुक्त ४ संचालकांची मते निर्णायक ठरल्याचे स्पष्ट झाले. तसेच या संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरणही करण्यात आले.

पुन्हा ५००, २००० रु.च्या नोटा बंद करा

आंध्रचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांची मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

अमरावती – आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी ५०० आणि २ हजारच्या नोटा चलनातून बंद करण्याची मागणी केली आहे. देशात केवळ १०० आणि २०० रुपयांच्या नोटाच चलनात ठेवाव्यात, असे मत त्यांनी व्यक्त केले. मोठ्या मूल्याच्या नोटांचे चलन कमी करून डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन दिल्यास भ्रष्टाचाराला आळा घालण्यास मदत होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

डिजिटल चलनासंदर्भात यापूर्वीही आपण एक अहवाल तयार करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे सादर केला होता. आता पुन्हा एकदा हा मुद्दा



पंतप्रधानांकडे उपस्थित करणार असल्याचे नायडू यांनी स्पष्ट केले. अमरावती येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही मागणी केली. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी झालेल्या नोटाबंदीला दहा वर्षे पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी नायडू यांनी हे विधान केले. दरम्यान, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने १९ मे २०२३ रोजी २,००० रुपयांच्या नोटा चलनातून मागे घेण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या नोटा अद्याप कायदेशीर चलन असून त्याद्वारे व्यवहार करता येतात. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी केंद्र सरकारने ५०० आणि १,००० रुपयांच्या जुन्या नोटा चलनातून रद्द केल्या होत्या.आंध्र प्रदेशातील नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा संदर्भ देत नायडू यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) जनतेचा वाढता पाठिंबा मिळत असल्याचा दावा केला. या निवडणुकांमध्ये पैशांच्या बळाचा प्रभाव कमी करण्यात आघाडीला यश आल्याचेही त्यांनी सांगितले.

अमेरिका पाकिस्तानमध्ये राजदूत नेमणार : नताली बेकर यांची वर्णी लागणार? ट्रम्प यांनी केली शिफारस, सिनेटच्या मंजुरीची प्रतीक्षा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

इस्लामाबाद – अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानमधील पुढील अमेरिकी राजदूत म्हणून नताली बेकर यांच्या नावाची शिफारस केली आहे. त्यामुळे जवळपास दोन वर्षांच्या खंडानंतर इस्लामाबादमध्ये कायमस्वरूपी अमेरिकी राजदूताची नियुक्ती होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

बेकर सध्या इस्लामाबाद येथील अमेरिकी



दूतावासात प्रभारी राजनैतिक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. जानेवारी २०२५ मध्ये तत्कालीन अमेरिकी राजदूत डोनाल्ड आर्मिन ब्लोम यांनी पद सोडल्यानंतर त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली होती.

सिनेटची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर बेकर यांची पाकिस्तानमधील अमेरिकी राजदूत म्हणून नियुक्ती केली जाईल. अमेरिकेत, राजदूतांची नियुक्ती राष्ट्राध्यक्षांकडून केली जाते, परंतु त्यासाठी सिनेटची मंजुरी आवश्यक असते.

व्हाईट हाऊसने पाठवलेल्या या नामांकनाची प्रथम सिनेटच्या परराष्ट्र संबंध समितीकडून समीक्षा केली जाईल. समितीच्या मंजुरीनंतर संपूर्ण सिनेटमध्ये मतदानाद्वारे शिक्कामोर्तब झाल्यावर नताली बेकर अधिकृतपणे राजदूतपदाचा कार्यभार स्वीकारतील.

ऑनलाईन खत बुकिंग प्रणाली बंद करा : रुपेश वाळके यांची मागणी

१४ पायऱ्यांच्या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांची गैरसोय : संत्रा उत्पादकांना वेळेवर खते मिळेना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मोर्शी – राज्यातील शेतकऱ्यांसाठी लागू करण्यात आलेल्या रासायनिक खतांच्या ऑनलाइन बुकिंग प्रणालीमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. खत खरेदीसाठी १४ पायऱ्यांची ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करावी लागत असल्याने ही प्रणाली तात्काळ बंद करून



पूर्वीप्रमाणे ऑफलाइन खत विक्री सुरू करावी, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे मोर्शी तालुकाध्यक्ष रुपेश वाळके यांनी शासनाकडे केली आहे.

मोर्शी-वरुड परिसरातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना या प्रणालीचा मोठा फटका बसत असून, इंटरनेट समस्या, तांत्रिक अडचणी आणि ऑनलाइन प्रक्रियेतील मर्यादांमुळे आवश्यकतेनुसार वेळेवर खते मिळणे कठीण झाले आहे. आधीच दुष्काळ, पाणीटंचाई, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारभावातील अनिश्चितता यांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणी यातून वाढल्या आहेत.

शासनाने प्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल प्रणालीचा फेरविचार करून ऑनलाइन बुकिंगची सक्ती बंद करावी व शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार मुबलक प्रमाणात खते उपलब्ध करून देण्यासाठी ऑफलाइन विक्री सुरू करावी, अशी मागणी रुपेश वाळके यांनी केली आहे.

संपादकीय

राष्ट्र प्रथमचा विचार रुजविणारे नेतृत्व : लालकृष्ण अडवाणी

भारतीय राजकारणाच्या प्रदीर्घ प्रवासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, ज्यांचे योगदान केवळ सत्तेच्या राजकारणापुरते मर्यादित राहत नाही, तर ते विचारांची, संघटनात्मक बांधणीची आणि कार्यकर्त्यांच्या पिढ्या घडविण्याची प्रेरणा ठरतात. भारतीय राजकारणातील असेच एक ज्येष्ठ आणि अनुभवी व्यक्तिमत्त्व म्हणजे भारतरत्न लालकृष्ण अडवाणीजी. त्यांच्या राजकीय प्रवासाकडे पाहताना संघर्ष, निष्ठा, संघटन कौशल्य आणि राष्ट्र प्रथम या विचारांची ठाम बांधिलकी प्रकर्षाने जाणवते. लालकृष्ण अडवाणी यांनी भारतीय जनता पक्षाच्या जडणघडणीत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. पक्षाची विचारधारा सर्वसामान्य कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचविणे, संघटन मजबूत करणे आणि राजकीय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, या कार्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यांनी केवळ राजकीय नेते घडविले नाहीत, तर कार्यकर्त्यांच्या अनेक पिढ्यांना वैचारिक दिशा दिली. त्यांच्या नेतृत्वाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे पक्षनिष्ठेपेक्षा राष्ट्रनिष्ठेला अधिक महत्त्व देणारा विचार. 'राष्ट्र प्रथम, पक्ष नंतर आणि स्वतः शेवटी' ही भूमिका भारतीय राजकारणात एक महत्त्वाचा संदेश देणारी ठरली. राजकारण हे केवळ सत्ताप्राप्तीचे साधन नसून राष्ट्रनिर्मितीचे माध्यम असले पाहिजे, हा विचार त्यांच्या सार्वजनिक जीवनातून अधोरेखित होतो. अडवाणीजींचा राजकीय प्रवास अनेक चढ-उतारांनी भरलेला आहे. अनुकूल परिस्थिती असो किंवा प्रतिकूल काळ, त्यांनी आपली वैचारिक भूमिका आणि संघटनात्मक बांधिलकी कायम ठेवली. राजकीय क्षेत्रात यश आणि अपयश येत असते; मात्र दीर्घकाळ टिकणारे नेतृत्व हे विचारांशी असलेल्या प्रामाणिक निष्ठेतूनच निर्माण होते, याचे उदाहरण त्यांच्या जीवनातून पाहायला मिळते. आज भारतीय जनता पक्ष देशातील एक मोठा राजकीय पक्ष म्हणून उभा आहे. या प्रवासात अनेक नेत्यांचे आणि लाखो कार्यकर्त्यांचे योगदान आहे. मात्र पक्षाच्या सुरुवातीच्या काळातील संघटनात्मक बांधणी, वैचारिक विस्तार आणि कार्यकर्त्यांना दिलेली प्रेरणा यामध्ये अडवाणीजींचे स्थान वेगळे आहे. आजच्या पिढीतील राजकीय कार्यकर्त्यांनी त्यांच्या प्रदीर्घ अनुभवातून संयम, शिस्त, सातत्य आणि संघटनात्मक निष्ठा या गोष्टी शिकण्याची गरज आहे. राजकारणात आज विचारांपेक्षा व्यक्तिकेंद्रित राजकारणाला अधिक महत्त्व मिळत असल्याचे चित्र दिसते. अशा परिस्थितीत अडवाणीजींच्या राजकीय जीवनाचा विचार करणे अधिक आवश्यक ठरते. मतभेद असू शकतात, राजकीय भूमिका वेगवेगळ्या असू शकतात; परंतु सार्वजनिक जीवनातील योगदानाचा आदर करणे ही भारतीय लोकशाहीची परंपरा आहे. वयाची शंभरी गाठण्याच्या उंबरठ्यावर असलेले अडवाणीजी हे एका प्रदीर्घ राजकीय पर्वाचे साक्षीदार आहेत. त्यांच्या अनुभवाचा लाभ नव्या पिढीला मिळत राहावा, त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे, हीच सदिच्छा. त्यांच्या जीवनातील राष्ट्रनिष्ठा, संघटन कौशल्य आणि कार्यकर्त्यांप्रती असलेली बांधिलकी यांचा आदर्श पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरावा.




"यश मिळवण्यासाठी नशिबाची वाट पाहू नका, आपल्या कष्टांवर विश्वास ठेवा कारण प्रामाणिक प्रयत्नांना यशाची साथ नक्कीच मिळते!"

संवेदनशील प्रशासनाचा दुष्काळातील मानवी चेहरा

दिवाळी हा आनंद, उत्साह आणि मांगल्याचा सण. मात्र, यंदा महाराष्ट्रातील अनेक शेतकरी कुटुंबांसाठी दुष्काळाच्या संकटामुळे या सणाचा आनंद काहीसा कमी झाला आहे. अनियमित पाऊस, पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि आर्थिक अडचणी अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबे सण साजरा करीत आहेत. अशा वेळी राज्य शासनाने केवळ आर्थिक मदत आणि प्रशासकीय निर्णयांपुरती आपली भूमिका मर्यादित न ठेवता, प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या घरापर्यंत पोहोचून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा प्रयत्न केला आहे. एका बाजूला शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत आर्थिक मदत जमा होत असताना, दुसऱ्या बाजूला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील सहकारी ग्रामीण भागात जाऊन शेतकरी कुटुंबांसोबत दिवाळी साजरी करीत आहेत. शासनाच्या या दोन्ही कृतींतून प्रशासनाचा संवेदनशील आणि मानवी चेहरा अधोरेखित होत आहे.

मंत्र्यांचे दौरे ही नियमित प्रशासकीय बाब आहे. मात्र, यावेळचे ग्रामीण भागातील दौरे हे केवळ विकासकामांचा आढावा घेणे किंवा अधिकाऱ्यांच्या बैठका घेणे एवढ्यापुरते मर्यादित नाहीत. शासकीय शिष्टाचार आणि



आनंद, भेटीगाठी आणि विरंगुळ्याचा सण असतो. अशा वेळी आर्थिक मदतीसोबतच शासनाने संवेदनशीलतेचाही परिचय दिला आहे.

राज्य शासनासोबतच केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २४ वा हप्ता ३० ऑक्टोबर रोजी वितरित करण्यात आला. या हप्त्यांतर्गत देशातील ९ कोटी ३४ लाख पात्र शेतकरी कुटुंबांना १८ हजार ६९० कोटी रुपयांहून अधिक निधी थेट बँक खात्यांत जमा करण्यात आला. केंद्र आणि राज्य शासनाच्या या आर्थिक सहाय्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याचा प्रयत्न होत आहे.

याशिवाय, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी पीककर्जाचे पुनर्गठन, कर्जवसुलीला स्थगिती, शैक्षणिक शुल्कात सवलत,



औपचारिकतेच्या पलीकडे जाऊन या भेटींमधून संवेदनशीलतेचा प्रत्यय येत आहे. संकटाच्या काळात कुणीतरी आपल्या सोबतीला आहे, आपली विचारपूस करीत आहे, ही भावनाच सामान्य माणसाला मोठा दिलासा देणारी असते. मुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळातील सदस्यांनी महाराष्ट्रातील विविध ग्रामीण भागांत पोहोचून या भावनेला बळ देण्याचा प्रयत्न केला आहे.

विशेष म्हणजे, या भेटी केवळ आश्वासनांपुरत्या मर्यादित नाहीत. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा मिळावा, यासाठी राज्य शासनाने पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय घेतला. थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा करण्यात येत आहे. ५ नोव्हेंबरपर्यंत राज्यातील ८७ लाख ४५ हजार ६६९ शेतकऱ्यांच्या खात्यांत ४ हजार ३७२ कोटी ८३ लाख रुपयांची मदत जमा झाली आहे.

दिवाळीसारख्या आनंदाच्या सणात आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबांना हा दिलासा महत्त्वाचा ठरला आहे. सामान्य माणसाच्या आयुष्यात दिवाळी हा पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा आणि पाण्याचे नियोजन अशा विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. पात्र शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचाही लाभ देण्यात येत आहे. आर्थिक मदत, विविध सवलती आणि स्थानिक पातळीवरील उपाययोजनांच्या माध्यमातून शेतकरी कुटुंबांना दिलासा देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या निर्णयांमधून शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा विश्वास निर्माण होत आहे.

या संवेदनशील भूमिकेचे प्रत्यंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर जिल्ह्यातील भेटीतून आले. नरखेड तालुक्यातील लोहारी सावंगा येथील शेतकरी रामभाऊ बालपांडे यांच्या घरी मुख्यमंत्र्यांनी दिवाळी साजरी केली. विशेष म्हणजे, त्यांनी केवळ सदिच्छा भेट देऊन परत न जाता बालपांडे कुटुंबीयांसोबत वेळ घालवला आणि त्यांच्या घरी मुक्कामही केला. कुटुंबीयांशी संवाद साधताना शेतीची परिस्थिती, ग्रामीण भागातील अडचणी आणि पाण्याचे प्रश्न जाणून घेतले. अरुणाताई बालपांडे यांनी मुख्यमंत्र्यांचे औक्षण केले. घरगुती भोजनाचा आस्वाद घेत त्यांनी कुटुंबीयांसोबत दिवाळीचा आनंद अनुभवला.

राज्याचा प्रमुख आपल्या घरी येतो, आपल्या अडचणी समजून घेतो, आपल्या कुटुंबीयांशी आपुलकीने संवाद साधतो, हा सामान्य कुटुंबासाठी वेगळाच अनुभव असतो. अशा भेटींमधून शासन आणि नागरिक यांच्यातील संवादाला आत्मीयतेची जोड मिळते. या भेटीचे महत्त्व केवळ औपचारिक सदिच्छा भेटीपुरते मर्यादित नसून ग्रामीण भागातील वास्तव जाणून घेण्याच्या दृष्टीनेही ते महत्त्वाचे आहे.

मुख्यमंत्र्यांनी या भेटीला प्रशासन आपल्या दारी या संकल्पनेचे स्वरूप दिले. यावेळी शेतातील बोअरवेल खोदण्यावरील निर्बंध १५ डिसेंबरपर्यंत शिथिल करण्याबाबत घोषणा करण्यात आली. ही शिथिलता विशिष्ट क्षेत्रांतील फळबागांसाठी आवश्यक परवानगी आणि प्रशासकीय देखरेखीच्या अधीन असेल. तसेच स्थानिक जलसंधारण, सिंचन आणि पायाभूत सुविधांसंबंधीच्या प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली. मुख्यमंत्र्यांचा शेतकरी कुटुंबातील मुक्काम हा ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आत्मीयतेचा आणि विश्वासाचा अनुभव ठरला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही जालना तालुक्यातील भिलपुरी येथे दुष्काळग्रस्त शेतकरी अंबादास तांगडे यांच्या घरी भेट देऊन कुटुंबीयांसोबत दिवाळी साजरी केली. केवळ एक एकर शेतीवर उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या या कुटुंबाची परिस्थिती त्यांनी जाणून घेतली. कुटुंबीयांशी संवाद साधत



त्यांच्या आर्थिक अडचणी आणि शेतीची स्थिती समजून घेतली. यावेळी त्यांनी ग्रामीण भागातील साध्या घरगुती भोजनाचा स्वीकार करीत कुटुंबीयांसोबत दिवाळीचा आनंद अनुभवला. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांप्रमाणेच मंत्रिमंडळातील अन्य सदस्यांनीही विविध जिल्ह्यांमध्ये शेतकरी आणि गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. पालकमंत्र्यांनीही आपल्या जिल्ह्यांतील दुर्गम भागांमध्ये जाऊन दिवाळी भेटींच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधला. या उपक्रमातून शासन आपल्या पाठीशी आहे आणि सामान्य नागरिकांच्या हितासाठी कटिबद्ध आहे, हा विश्वास तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न झाला आहे.

या सर्व भेटींचे महत्त्व केवळ सण साजरा करण्यापुरते मर्यादित नाही. शासनातील सर्वोच्च पदावरील व्यक्ती सामान्य शेतकऱ्याच्या घरात जाऊन त्याच्या कुटुंबीयांशी संवाद साधते, त्यांच्या अडचणी जाणून घेते आणि त्यांच्या



भोजनाचा स्वीकार करते, तेव्हा शासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवादाला आत्मीयतेची जोड मिळते. मंत्र्यांचा साधेपणा, कुटुंबीयांशी साधलेला संवाद आणि ग्रामीण जीवनाशी जोडून घेण्याचा प्रयत्न यामुळे संबंधित कुटुंबांसह परिसरातील नागरिकांनाही विश्वास आणि समाधानाचा अनुभव मिळतो. शासनाच्या योजना आणि निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याबरोबरच त्यांच्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेण्याची संधी अशा उपक्रमांमुळे निर्माण होते.

दुष्काळ हा केवळ शेतीच्या उत्पादनावर परिणाम करणारा प्रश्न नसून त्याचे परिणाम शेतकरी कुटुंबातील शिक्षण, आरोग्य, रोजगार, विवाह आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही होतात. त्यामुळे अशा संकटाच्या काळात आर्थिक मदतीसोबतच सामाजिक आणि भावनिक आधार देणेही महत्त्वाचे ठरते. अर्थात, या भेटींमधून व्यक्त झालेला विश्वास प्रत्यक्ष मदतीच्या सातत्यपूर्ण अंमलबजावणीतून अधिक दृढ होणे आवश्यक आहे. पात्र लाभार्थ्यांपर्यंत मदत वेळेत पोहोचणे, पिण्याच्या पाण्याची आणि जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता कायम ठेवणे, तसेच शेतीच्या पुनर्बांधणीसाठी प्रभावी उपाययोजना करणे, हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे.

शेतकऱ्यांच्या खात्यांत आर्थिक मदत जमा करणे, त्यांच्या प्रश्नांवर निर्णय घेणे आणि त्याच वेळी त्यांच्या घरापर्यंत पोहोचून सुख-दुःखात सहभागी होणे, या दोन्ही गोष्टींमधून शासनाची भूमिका स्पष्ट होते. संकटाच्या काळात शेतकरी एकटा नाही, शासन त्याच्या पाठीशी आहे, हा विश्वास निर्माण करणे हीच या उपक्रमांची महत्त्वाची फलश्रुती आहे.

यासोबतच ग्रामीण भागातील या भेटींमधून भविष्यातील विकासाचे प्राधान्यक्रम निश्चित करण्याची संधीही उपलब्ध झाली आहे. अनेक वर्षांपासून कोणत्या पायाभूत सुविधा अपुऱ्या राहिल्या आहेत, पाणी साठवण, सिंचन, जलसंधारण, शेतीपूरक व्यवसाय आणि ग्रामीण रोजगाराच्या क्षेत्रांत कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत, याचा प्रत्यक्ष अनुभव शासनाच्या सर्वोच्च स्तरावरील नेतृत्वाला मिळणे महत्त्वाचे आहे. हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या अनिश्चिततेचा विचार करून शाश्वत उपाययोजना आखणे गरजेचे आहे. भविष्यात कितीही भीषण दुष्काळ पडला, तरी ग्रामीण जीवनाची घडी विस्कटणार नाही, अशी सक्षम व्यवस्था निर्माण करण्यासाठी या भेटी दिशादर्शक ठरू शकतात. त्यामुळे या उपक्रमांचा दुहेरी फायदा आहे. एकीकडे संकटग्रस्त कुटुंबांना भावनिक आधार मिळतो, तर दुसरीकडे भविष्यातील विकासाचे नियोजन करण्यासाठी शासनाला वास्तवाचे आकलन होते.

दिवाळीच्या प्रकाशात दुष्काळग्रस्त कुटुंबांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. आर्थिक मदतीला माणुसकीची जोड देत शासनाने सामान्य माणसाच्या जीवनाशी नाते जोडण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांच्या घरातील पणती तेवत ठेवण्यासाठी त्यांच्या खात्यांत निधी पोहोचत आहे आणि त्याच वेळी शासनाचे प्रतिनिधी त्यांच्या दारात पोहोचत आहेत. हाच आहे संवेदनशील प्रशासनाचा दुष्काळातील मानवी चेहरा!

प्रवीण टाके
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर
९७०२८५८७७७

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती येथे दुर्मिळ शस्त्रक्रिया यशस्वी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



अमरावती – विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे मूत्राशयाच्या कर्करोगावरील अत्यंत दुर्मिळ शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. मूत्राशयाचा कर्करोग हा एक कॉमन कॅन्सर असून, विशेष करून तंबाखू सेवन व धूम्रपान यामुळे अशा रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ झालेली आहे.

सामान्यत: मूत्राशयाच्या कॅन्सरची दुर्बीण द्वारे शस्त्रक्रिया पुरेशी असते . परंतु जर कॅन्सरचे प्रमाण जास्त असेल आणि तो पसरलेला असेल , तर त्याचा परिणाम किडनीवर होतो. म्हणून ठरवळलरश्र ऊींशलीूं हा एक उत्तम पर्याय आहे.

परंतु ही शस्त्रक्रिया अतिशय जोखमीची आणि धोकादायक असते. पेशंटचा संपूर्ण मूत्राशय काढून टाकावा लागतो. तसेच या शस्त्रक्रियेला लागणारा वेळ, कुशलता, एकाग्रता, समन्वयकता आदी आवश्यक असते व ती दुर्मिळ आहे.

ही शस्त्रक्रिया विशेष उल्लेखनीय आहे कारण मूत्राशय संपूर्ण काढून टाकल्यानंतर पर्यायी व्यवस्था आतड्याचे काही भाग वापरून निर्माण करण्यात आली. Neo-Bladder तयार करण्यात आला. ही शस्त्रक्रिया प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत करण्यात आली. सदर शस्त्रक्रिया विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ.मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.अतुल यादगिरे व डॉ.पूजा पाटील यांच्या मार्फत करण्यात आली. सदर शस्त्रक्रियेमधे भूलतज्ञ डॉ.राखी वानखडे, डॉ.किरण पारिसे, डॉ.अभिनव निकम, डॉ.स्नेहा चव्हाण, डॉ.अभिजीत वानखडे, डॉ.नंदिनी चव्हाण, डॉ.आदित्य तेवरे तसेच अधीसेविका चंदा खोडके, मालती प्रधान यांच्या सूचनेनुसार संगीता आष्टेकर, मनीषा रामटेके , प्रियांका गायकवाड, वैष्णवी मरकाळे, सुमित्रा कोरे, वैभवी कोठाळकर, ईश्वरी येवले, वंदना जाधव, लक्ष्मण वालुकर, शारदा राठोड, अथर्व लोंढे, शंकर झायटे, लक्ष्मी सोनोने इ. मोलाचे सहकार्य होते.

मराठा समर्थक अनब लक्ष्मण हाकेंच्या समर्थकांमध्ये तुंबळ हाणामारी : सोलापूरच्या आडेगावमधील बिरोबा यात्रेतील उपस्थितीवर आक्षेप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



सोलापूर – जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात मराठा समर्थक आणि ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या समर्थकांमध्ये तुंबळ हाणामारीची घटना घडली आहे. आडेगाव येथे लक्ष्मण हाके यांच्या समर्थकांना जाब विचारात मराठा समर्थकांनी लक्ष्मण हाकेंच्या अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न केला. तुम्ही इथे कशाला आलात, असं विचारात मराठा समर्थकांनी लक्ष्मण हाकेंच्या बिरोबा मंदिरातील यात्रेतील उपस्थितीवर आक्षेप घेतला. सुरवातीला शाब्दिक चकमक आणि मग तुंबळ हाणामारीची घटना घडली आहे. याबात ओबीसी नेते प्राध्यापक लक्ष्मण हाके प्रतिक्रिया देत निषेध नोंदवला आहे. देवाच्या दारात असं कृत्य कितपत योग्य आहे? आम्ही कुठं फिरायचंच नाही का? असा सवाल यावेळी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी उपस्थित करत अशा धमक्यांना आम्ही न घाबरता आमचा लढा आजून तीव्र करू, अशी प्रतिक्रिया दिली आहे. मोहोळ तालुक्यातील पोखरापूरच्या बिरोबा यात्रेमध्ये आम्ही सहभागी झालो होतो. त्यानंतर तिथून जवळच असलेल्या बिरोबा मंदिरात आम्ही दर्शन घ्यायला गेलो होतो. यावेळी पूजऱ्यांच्या आग्रहानंतर आम्ही सत्कार घेत होतो. यावेळी माईकवर बोलणाऱ्या आणि समोर बसलेल्या काही जणांमध्ये शाब्दिक चकमक झाली. त्यावेळी काही लोक कार्यकर्त्यांच्या अंगावर धावून आले. आणि तुम्ही इथे कशाला आलात असं म्हणत अंगावर धावून आले. मग आमच्याही कार्यकर्त्यांचा मॉब होता. त्यामुळे त्यांच्यात झटापट झाली.

मंत्रालयाच्या कँटीनमध्ये मिळणार शेगावची कचोरी, पुणेरी मिसळ : ५४ नव्या पदार्थांचा समावेश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – मंत्रालय आणि विधानभवनातील कँटीनमधील खाद्यपदार्थांच्या दर्जात सुधारणा करण्याबरोबरच कर्मचाऱ्यांना पौष्टिक आणि संतुलित आहार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने पावले उचलली आहेत. त्यानुसार या दोन्ही कँटीनमध्ये शेगावची कचोरी, पुणेरी मिसळ यांसारख्या प्रादेशिक खाद्यपदार्थांसह बीट कबाब, दलिया उपमा, मंचाव सूप, उकडलेला मका आणि हराभरा कबाब अशा सुमारे ५४ नव्या पदार्थांचा समावेश करण्यात येणार आहे. मंत्रालय आणि विधानभवनातील कँटीनमध्ये स्वच्छता तसेच खाद्यपदार्थांचा दर्जा सुधारण्याचा मुद्दा अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीनंतर आणि उच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतर ऐरणीवर आला होता. त्यानंतर कँटीनमधील खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे. बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव आणि संतुलित आहाराकडे होणारे दुर्लक्ष यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याची बाब लक्षात घेऊन कँटीनमध्ये पौष्टिक पदार्थ उपलब्ध करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता.

मुंबई विमानतळावरील एकही आंतरराष्ट्रीय उड्डाण नवी मुंबईत हलवणार नाही

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा केंद्र सरकारला धाडलं पत्र

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील एकही विमान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर हलवले जाणार नाही, अशी ठाम आणि स्पष्ट भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. मुंबई विमानतळावरील उड्डाणे नवी मुंबईत स्थलांतरित करण्याची कोणतीही योजना नसून, दोन्ही विमानतळ स्वतंत्रपणे आणि आपापल्या क्षमतेनुसार पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समोर आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय नागरी उड्डाणमंत्र्यांना थेट पत्र लिहून आपला तीव्र आक्षेप नोंदवला असून टर्मिनल-१ च्या पुनर्विकासासाठी एक पर्यायी प्रस्तावही सादर केला आहे. काय आहे नेमकं प्रकरण? मुंबई विमानतळाचे संचालन करणाऱ्या 'एमआयएएल' या कंपनीने पुढील उन्हाळ्याच्या वेळापत्रकापासून बहरीन, दोहा, जकारता, जेद्दाह, कुवेत, मस्कत, रियाध आणि शारजा यांसारख्या १४ प्रमुख आंतरराष्ट्रीय शहरांसाठीची विमानसेवा नवी मुंबई विमानतळावर हलवण्याची योजना आखली होती. टर्मिनल-१ च्या पुनर्विकास कामांमुळे उन्हाळ्यातील स्लॉट्स सामावून घेणे कठीण होईल, तसेच टर्मिनल-२ मधील आंतरराष्ट्रीय उड्डाणांमध्ये सुमारे एक तृतीयांश कपात करावी लागेल, असा युक्तिवाद कंपनीने केला होता. यामुळे दरवर्षी सुमारे ५० लाख देशांतर्गत प्रवाशांच्या क्षमतेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती.

हार्दिक पांड्या पंजाबमध्ये, अर्शदीप सिंग मुंबई इंडियन्समध्ये!

१८ कोटींचा मोठा ट्रेड?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – भारतीय क्रिकेट वतुर्ळातून एक अतिशय मोठी आणि डोळे दिपवणारी खळबळजनक बातमी समोर येत आहे. आगामी इंडियन प्रीमियर लीग २०२७ च्या हंगामापूर्वी दोन मोठ्या आणि आघाडीच्या फ्रँचायझींनी एका अत्यंत आश्चर्यकारक, थरारक आणि हाय-प्रोफाइल खेळाडू अदलाबदलीची अधिकृत घोषणा केली आहे.

या ब्लॉकबस्टर ट्रेडमुळे संपूर्ण क्रिकेट विश्वात एकच खळबळ उडाली असून सोशल मीडियावर चाहत्यांमध्ये याचीच चर्चा रंगली आहे. भारताचा स्फोटक अष्टपैलू खेळाडू आणि मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार हार्दिक पांड्या आता पंजाब किंग्सच्या ताफ्यात दाखल झाला आहे, तर दुसरीकडे भारताचा प्रमुख वेगवान गोलंदाज आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज अर्शदीप सिंग हा पाच वेळा आयपीएल चॅम्पियन ठरलेल्या मुंबई इंडियन्स संघात सामील झाला आहे.

या बहुचर्चित आणि मोठ्या करारामुळे हार्दिक पांड्याच्या मुंबई इंडियन्ससोबतच्या दुसऱ्या पर्वाचा आता अधिकृतपणे अंत झाला आहे. हार्दिकने २०१५ मध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळताना आपल्या आयपीएल कारकिर्दीची अत्यंत यशस्वी सुरुवात केली होती. मुंबईच्या ताफ्यात असताना त्याने २०१५, २०१७, २०१९ आणि २०२० अशा तब्बल चार सुवर्ण हंगामांत चमकदार आणि धडाकेबाज कामगिरी करत संघाला चार वेळा आयपीएलचे मानाचे विजेतेपद मिळवून देण्यात अत्यंत मोलाची भूमिका बजावली होती.

यादरम्यान त्याने फलंदाजी आणि गोलंदाजी अशा दोन्ही आघाड्यांवर अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत स्वतःला एक अव्वल दर्जाचा मॅच-विनर म्हणून जगभरात सिद्ध केले होते. तदनंतर, २०२२ च्या हंगामापूर्वी हार्दिकने मुंबईची साथ सोडत नवीन संघ असलेल्या गुजरात टायटन्सचे नेतृत्व स्वीकारले आणि पदार्पण करणाऱ्या गुजरात संघाला पहिल्याच प्रयत्नात भव्य जेतेपद मिळवून देत इतिहास रचला.

'सत्तेपेक्षा सिद्धांत अन धर्म श्रेष्ठ'

एकनाथ शिंदेंचा 'सनातन मार्तंड' पुरस्काराने सन्मान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वाराणसी – उत्तर प्रदेशातील धार्मिक व सांस्कृतिक नगरी वाराणसी (काशी) येथे आयोजित तीन दिवसीय 'संस्कृती संसद २०२६' या आध्यात्मिक महाकुंभात महाराष्ट्राच्या राजकीय आणि सांस्कृतिक परंपरेचा मोठा गौरव करण्यात आला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देशभरातील प्रमुख साधू-संत, महामंडलेश्वर आणि धर्माचार्यांच्या उपस्थितीत 'सनातन मार्तंड पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यासोबतच त्यांना 'धर्मध्वजाधारक' ही विशेष उपाधी सन्मानपूर्वक बहाल करण्यात आली. पुरस्कार स्वीकारल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यासपीठावरून उपस्थितांवर पुष्पवृष्टी करत देशभरातून आलेल्या संत-महंतांना साष्टांग प्रणाम केला.

'हा सन्मान महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचा अनब वारकऱ्यांचा' 'सत्तेपेक्षा सिद्धांत मोठा, सत्तेपेक्षा सत्य मोठे आणि अधिकारापेक्षा धर्म व कर्तव्य नेहमीच श्रेष्ठ असते. सनातन धर्म, संत समाज, भारतीय संस्कृती आणि धर्मरक्षणासाठी माझ्या शरीरातील रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी पूर्ण निष्ठेने समर्पित राहीन. संत समाजाने दिलेला हा सन्मान माझा एकट्याचा नसून महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचा, भावांचा, शेतकऱ्यांचा, युवकांचा आणि वारकरी संप्रदायाचा आहे', असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या 'गर्व से कहो हम हिंदू हैं' या विचारांचा पुनरुच्चार करत एकनाथ शिंदे यांनी म्हटलं की, 'पालघरमध्ये साधूंची निर्घृण हत्या झाल्यानंतर धर्मरक्षणासाठी आणि तत्त्वांच्या जपणुकीसाठी आम्ही सत्तेचा त्याग करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. मुख्यमंत्री असो वा उपमुख्यमंत्री, मी आजही एक सामान्य कार्यकर्ता म्हणूनच जनतेची सेवा करत आहे.'

काशी अन महाराष्ट्राच्या शतकानु शतकांच्या नात्याचा गौरव काशी ही भारताची आत्मा असल्याचे सांगत शिंदे यांनी महाराष्ट्राच्या अभूतपूर्व शौर्य आणि संत परंपरेची आठवण करून दिली. संत ज्ञानेश्वरांनी दिलेला भागवत धर्माचा संदेश, संत नामदेवांनी पंजाबपर्यंत फडकावलेली भागवत पताका, आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासाठी काशीहून आलेले गागाभट्ट यांचा उल्लेख त्यांनी केला.

लोणी काळभोरमध्ये माजी सरपंचाची गुंडगिरी! हॉटेलमध्ये घुसून मालकासह कामगारांना बेदम मारहाण : बिलाच्या वादातून तुफान राडा, ४ जणांविरोधात गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



लोणी – लोणी काळभोर येथील प्रसिद्ध 'जगदंबा' हॉटेलमध्ये जेवणाचे बिल दिल्यावरून झालेल्या क्षुल्लक वादातून माजी सरपंच राहुल काळभोर आणि त्याच्या साथीदारांनी तुफान राडा घातल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

या घटनेत हॉटेल व्यावसायिक, त्यांचे कुटुंबिय आणि कामगारांना बेदम मारहाण करण्यात आली असून, काचेचे भांडे फेकून मारल्याने फिर्यादी जखमी झाले आहेत. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात राहुल दत्तात्रय काळभोरसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस फिर्यादीनुसार, ९ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ९:०० वाजण्याच्या सुमारास कदमवाकवस्ती (एन्जेल हायस्कूलजवळ) येथील 'जगदंबा' हॉटेलमध्ये ही घटना घडली. हे हॉटेल मागील ३० वर्षांपासून राजेंद्र चौधरी (वय ५६) हे चालवत आहेत. घटनेच्या रात्री आरोपी रामचंद्र ऊर्फ रामभाऊ दत्तात्रय काळभोर हा जेवणासाठी हॉटेलमध्ये आला होता. जेवण झाल्यानंतर त्याने ऑनलाईन बिल पे केले आणि 'माझे बिल आले का?' अशी विचारणा केली. हॉटेल मालकाने 'हो, तुमचे बिल जमा झाले आहे' असे सांगताच रामचंद्र काळभोर याने कोणतीही चिथावणी नसताना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. मध्यस्थी करायला आलेल्या मुलाला मारहाण हॉटेलमध्ये सुरू असलेल्या वादाचा आवाज ऐकून राजेंद्र चौधरी यांचा मुलगा मयूर चौधरी (वय २२) तिथे आला. त्याने वाद सोडवण्याचा आणि रामचंद्र याला समजावण्याचा प्रयत्न केला असता, रामचंद्रने त्यालाही शिवीगाळ करत धक्काबुक्की व मारहाण केली. त्यानंतर मयूरने रामचंद्रला हॉटेलबाहेर काढले. माजी सरपंच राहुल काळभोरची एन्ट्री अनब हॉटेलमध्ये तोडफोड या घटनेनंतर काही मिनिटांतच रामचंद्रचा भाऊ आणि लोणी काळभोरचा माजी सरपंच राहुल दत्तात्रय काळभोर, स्वप्निल काळभोर आणि विकास काळभोर हे बेकायदेशीरपणे हॉटेलमध्ये घुसले. आरोपींनी हॉटेल मालक राजेंद्र चौधरी आणि कामगारांवर हल्ला चढवला. मारहाणीदरम्यान आरोपी स्वप्निल काळभोर याने काउंटरवर ठेवलेले बडीशेपेचे काचेचे भांडे उचलून थेट राजेंद्र चौधरी यांच्या तोंडावर मारले. तसेच मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या हॉटेलमधील ग्राहक दीपक कुकरेजा आणि कामगार मिराज ऊर्फ शमामुल अन्सारी यांनाही आरोपींनी मारहाण केली.

अजित दादांच्या प्रथम स्मृतीदिनाआधी दोन्ही राष्ट्रवादीचं विलिनीकरण व्हावं : अमोल मिटकरींनी नेमकं काय म्हटलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



अकोला – दोन्ही राष्ट्रवादीचे विलिनीकरण हीच अजित दादांना खरी श्रद्धांजली आहे. त्यामुळे, येत्या २८ जानेवारीच्या पहिल्या स्मृतिदिनाआधी दादांच्या एकत्रीकरणाचं स्वप्न पूर्ण व्हावं, असे राष्ट्रवादीचे माजी आमदार अमोल मिटकरी यांनी म्हटलं. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चेला आणखी हवा मिळाली आहे. अमोल मिटकरी यांनी सातत्याने अजित पवारांच्या निधनाच्या चौकशीची मागणी केली असून हा घातपात असल्याचं संशय त्यांनी व्यक्त केलाय. आता, विलिनीकरणाच्या मुद्द्यावर त्यांनी आपली भूमिका मांडली.

राज्यात पुन्हा एकदा दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा जोरदारपणे सुरू आहे. यापूर्वी, खासदार तथा शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी, विलिनीकरणाची चर्चा आमच्याकडून तरी संपुष्टात आल्याचं म्हटलं होतं. मात्र, गेल्या काही दिवसांपासून शरद पवारांसोबत सुरू असलेल्या भेटीगाठी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासमवेत झालेली चर्चा, त्यानंतर राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा वेगाने सुरू आहे. त्यातच, आता दोन ते अडीच महिन्यांनी अजित पवारांचा प्रथम स्मृतीदिन येत आहे. मात्र, त्यापूर्वीच हे विलिनीकरण व्हावे, अशी इच्छा अमोल मिटकरींनी व्यक्त केलीय. दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण हीच अजितदादांना खरी श्रद्धांजली ठरणार आहे, त्यामुळे २८ जानेवारीला दादांच्या पहिल्या स्मृतिदिनाआधी दादांचं एकत्रीकरणाचं स्वप्न पूर्ण व्हावं, अशी इच्छा अमोल मिटकरी यांनी अकोला येथे बोलताना व्यक्त केली. दरम्यान, महाराष्ट्राला लवकरच 'गुड न्यूज' मिळेल असंही ते म्हणालेत. दोन्ही राष्ट्रवादींच्या विलिनीकरणावर सूचक वक्तव्य करताना मिटकरी यांनी 'आगे आगे देखीये, होता है क्या' असं म्हटलं. विलिनीकरणाच्या निर्णयासंदर्भात आमचा संपूर्ण पक्ष सुनेत्रा वहिनींच्या पाठीशी खंबीर आहे. सुनेत्रा वहिनी म्हणतील तेच पक्षाचे 'धोरण आणि त्या बांधतील तेच तोरण' असं सर्वसामान्य कार्यकर्त्यांचं मत आहे, असेही त्यांनी म्हटले.

संजय राऊतांनी स्वत:च्या पक्षाची काळजी करावी – मिटकरी दरम्यान, राष्ट्रवादीचे २० आमदार फुटणार असल्याचं वक्तव्य खासदार संजय राऊत यांनी केलं होतं. त्यावर, मिटकरी यांनी खिल्ली उडवली. आमच्या पक्षाची काळजी करण्यापेक्षा संजय राऊत यांनी स्वतःच्या पक्षाकडे पहावं, असा टोला त्यांनी लगावला.

अंबानगरीत रंगणार कलाल समाजाचा मेळावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



अमरावती – अंबानगरी अमरावतीत १३ ते १५ नोव्हेंबर दरम्यान अखिल भारतीय कलाल कलार समाज समिती आणि अखिल भारतवर्षीय हैहय कलचुरी महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय भव्य महाकुंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात शेतकरी मार्गदर्शन मेळावा, तरुणांसाठी रोजगार उद्योग संधी, थेट संवादातून जोडीदार निवडणारे वधूवर संमेलन आणि राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा पार पडणार असून देशभरातून हजारो समाजबांधव शहरात एकत्र दाखल होणार असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष सुनील खराटे यांनी आपली मातृभूमीशी बोलतांना दिली.

अखिल भारतीय कलाल कलार समाज समितीचे अध्यक्ष सुनील खराटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या महाकुंभाचा मुख्य उद्देश केवळ पारंपरिक गाठीभेटीपुरता मर्यादित नसून तरुण, शेतकरी आणि उद्योजकांच्या प्रगतीला पैट बळ देणे हा आहे. त्यामुळेच आधुनिक काळाची गरज ओळखून या कार्यक्रमाची संपूर्ण आखणी केली आहे. पहिल्या दिवशी १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सोमेश्वर पुसतकर सभागृहात शेतकरी व कृषी मेळावा रंगेल. या मेळाव्यात तज्ज मंडळी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, पूरक उद्योग आणि नव्या पद्धतीचे मार्गदर्शन करतील. त्यानंतर १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता याच सभागृहात रोजगार, उद्योग आणि व्यवसाय मेळावा भरेल.याच दिवशी सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या वधूवर मेळाव्यात केवळ पत्रिका न पाहता उपवर मुला-मुलींना एकमेकांशी बोलून जोडीदार ठरवता येणार आहे. तसेच १३ ते १५ नोव्हेंबर दरम्यान हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या भव्य मैदानावर महिला व पुरुषांची राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा रंगणार असून राज्यातील अनेक संघ यात भिडतील. माजी खा.नवनीत राणा यांच्या अध्यक्षतेखाली श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता महासंमेलन रंगेल. उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे करतील. यावेळी मंत्री संजय राठोड, जयनारायण चौकसे, खा.डॉ.अनिल बोंडे, आ.प्रवीण पोटे, आ.रवी राणा, आ.संजय खोडके, प्रताप अडसड, उमेश यावलकर, आ.गजानन लवटे, महापौर श्रीचंद तेजवानी, जगदीश गुप्ता, डॉ.सुनील देशमुख, डॉ.नितीन धांडे, राजेंद्र मेवाडा, अजय जैस्वाल, ड.एम.एल.आय.हरिराम राय, अंजली नाईक, राजेंद्र जयस्वाल, सुनील चौथमल, पूनम चौधरी उपस्थित राहतील.

दिवाळीच्या अंगणात साकारली शिवसृष्टी : ग्रामीण भागात किल्ला संस्कृतीचा वारसा आजही जिवंत !

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – दिवाळी म्हटली की डोळ्यांसमोर आकाशकंदील, नवनवीन कपडे पणत्यांचा लखलखाट, फराळाचा सुगंध अन फटाक्यांची आतषबाजी उभी राहते; मात्र ग्रामीण महाराष्ट्रात मातीचा किल्ला हे दिवाळीचे मोठे आकर्षण आजही तितक्याच उत्साहाने पाहायला मिळते.

आधुनिकतेच्या झगमगाटात अनेक पारंपरिक गोष्टी मागे पडत असताना अंजनगाव सुर्जी शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात लहानग्यांनी किल्ला संस्कृतीची परंपरा आजही जिवंत ठेवली आहे. मातीच्या ढिगाऱ्याला आकार देत, शेणाने सारवून, दगड-धोंडे रचून अनब कल्पकतेतून ऐतिहासिक किल्ल्यांची प्रतिकृती साकारत बालपणातील दिवाळीला एक वेगळाच रंग दिला जात आहे. दिवाळीच्या काही दिवस आधीपासूनच गल्लीबोळात मुलांची लगबग सुरु होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांच्या प्रतिकृती उभारण्यासाठी लहान मुलांमध्ये जणू चढाओढच लागते. रायगड, प्रतापगड, राजगड, सिंहगड, सिंधुदुर्ग, मुरुड-जंजिरा, तोरणा, पुरंदर, पन्हाळगड, लोहगड, विसापूर अनब शिवनेरी अशा ऐतिहासिक दुर्गांच्या प्रतिकृती साकारताना मुलांचा उत्साह ओसंडून वाहतो. या किल्ल्यांवर मावळ्यांच्या मूर्ती, छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा, भगवा ध्वज, तोफा अन पहारेकरी यांची आकर्षक मांडणी केली जाते. यामुळे मुलांना सहकार्य, नियोजन, मेहनत अनब संघटित कामाचे महत्त्व शिकायला मिळते. डिजिटल मनोरंजनाच्या विळख्यात बालपण अडकत असताना ग्रामीण भागातील ही परंपरा निश्चितच कौतुकास्पद आहे.

वरुड येथे अखिल भारतीय युवा कला महोत्सव २०२६ चे भव्य आयोजन

तीन दिवस रंगणार चित्रकलेचा महाकुंभ : देशभरातून २०० चित्रकार सहभागी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – कलाजीवन बहुउद्देशीय संस्था अमरावती यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखिल भारतीय युवा कला महोत्सव २०२६ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव येत्या १८ ते २० डिसेंबर २०२६ या कालावधीत तीन दिवस यशोदाई सभागृह वरुड येथे संपन्न होणार आहे. या महोत्सवात संपूर्ण भारतातून सुमारे २०० युवा चित्रकार सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र, ओडिशा, छत्तीसगड, राजस्थान (जयपूर), उत्तर प्रदेश (बनारस) यासह अनेक राज्यातील नामवंत व नवोदित कलाकार आपली कला सादर करणार आहेत. या महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे कोकणचे विख्यात चित्रकार अरुण दाभोलकर यांचे प्रात्यक्षिक ठेवण्यात आले आहे. त्यांच्या कुंचल्यातून साकारणारी कला पाहण्याची संधी रसिकांना मिळणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात चित्र प्रदर्शन, स्पर्धा, कार्यशाळा, प्रात्यक्षिके आणि कलाकारांशी संवाद असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

तरुण कलाकारांना राष्ट्रीय स्तरावरील कलाकारांसोबत शिकण्याची व आपली कला सादर करण्याची मोठी संधी या निमित्ताने मिळणार आहे. सर्व तरुण कलाकार, चित्रकला महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक आणि कला प्रेमींनी या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सहभाग व अधिक माहितीसाठी संस्थापक तथा अध्यक्ष डॉ.युवराज ठाकरे, कलाजीवन बहुउद्देशीय संस्था, मोबा.९७३०५४०३९५ यांचेशी संपर्क करा.

पेट्रोल पंपावर कमी पेट्रोल देण्याची नेमकी युक्ती काय? कर्मचाऱ्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – अगदी खेड्यापाड्यांपासून ते शहरांपर्यंत सगळीकडे पेट्रोल पंप सर्रास आढळतात. दुचाकी, तीनचाकी, चारचाकी आणि अगदी दहाचाकी वाहनांचाही पेट्रोल पंपांशी थेट संबंध येतो. त्यामुळे, पेट्रोल पंपांवर आपली फसवणूक तर होत नाही, हे जाणून घेणे प्रत्येकासाठी उत्सुकतेचे असते. त्यामुळे आपण विविध ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने याबद्दल जाणून घेत असतो. याच समस्येबद्दल पेट्रोल पंपावरील एका कर्मचाऱ्याने व्हिडिओ बनवला जो सोशल मीडियावर आता व्हायरल होत आहे.

'Kirantai Babarao Meghe Education Society'
(REGD. NO. MAH/463/17/F-19460)
ORANGE CITY INSTITUTE OF NURSING (B.Sc. Nursing)
Near Railway Line, Nagpur Road, Roshankheda, Warud Tq. Warud, Dist. Amravati
Ph. No.: 07229 297980
Contact: 8010500968, 9673575964
Email: orangecityinstituteofnursing@gmail.com Website: https://www.orangecityinstituteofnursing.com
ADMISSION OPEN
B.Sc Nursing 2026-27
(For Institutional Level Quota)
Vacant Seats: Sc-01, St-01, Vja-01,Ntb(W)-1,Ntc-01, Ntd(W)-01, Obc-02, Sebc-04, Sebc (W)-02,Ews-04,Ews(W)02, Open -8, Open(W)-03, Total=31
(No.MED-1026/C.R.No.07/New Registration/CAP 3 & Inst. Level Round/2604 Date: 02/11/2026)
With reference to the above notification of Govt. of Maharashtra, State CET Cell, Mumbai applications are invited from eligible and interested candidates for admission to 1 St Year B.Sc. Nursing Under the institute Level Quota for academic year 2026-2027.
Eligible candidate (MH Nursing -CET appeared) desirous of admission must apply in person or through An authorized person to the college in the prescribed format from 11/11/2026 to 12/11/2026 up to 5.30 p.m.
The last date of Admission is 15/11/2026 at 5.30 pm
Principal
Orange City Institute of Nursing

युजीसी नेट व जेआरएफ परीक्षेत

समाजशास्त्र विषयामध्ये कल्याणीचे घवघवीत यश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



शेंदुरजनाघाट – येथील प्रगतशील शेतकरी सुभाष शिरभाते यांची कन्या कल्याणी सुभाष शिरभाते हिने समाजशास्त्र विषयामध्ये राष्ट्रीय स्तरावरील युजीसी नेट व जेआरएफ परीक्षेत तब्बल ९९.३६ पर्सेंटाईल गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.

तिच्या या उल्लेखनीय यशामुळे शिरभाते कुटुंबासह शेंदुरजनाघाट शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातून शिक्षण घेत कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर कल्याणीने हे यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे युजीसी नेट परीक्षेतील जेआरएफ पात्रता ही संशोधन क्षेत्रात पुढे जाण्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या यशामुळे तिला उच्च शिक्षण, संशोधन आणि शैक्षणिक क्षेत्रात करिअर करण्याच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत.

या यशाबद्दल कल्याणीचा कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य बाबाराव लोखंडे, महिला व बालकल्याण सभापती प्रिया नेपाल पाटील शिवसेना नगरसेवक विजय चौधरी शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच तिच्या पुढील शैक्षणिक वाटचाल, संशोधन कार्य आणि उज्ज्वल भविष्यासाठी उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी गुंफा चिंतामण शिरभाते, नेपाल पाटील, सुभाष शिरभाते, नलिनी शिरभाते, चेतन शिरभाते यांच्यासह कुटुंबीय व मित्रपरिवार उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करता येते याचे कल्याणी शिरभाते हिचे यश हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

तिच्या या यशामुळे शेंदुरजनाघाटच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली असून सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



दिवाळीसाठी आले, शिक्षक दाम्पत्याने जीवन संपवले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




नागपुर – नागपुरमधील एक धक्कादायक घटना समोर आली आहे. नागपुरात कुटुंबियांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी आलेल्या शिक्षक दाम्पत्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. मनीष गणवीर आणि सोनाली गणवीर असे आत्महत्या केलेल्या दांपत्याचे नाव आहे. दोघेही गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड येथील शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. दोघेही अगोदरचे घटस्फोटीत असल्याने दोघांचा ऑगस्ट महिन्यात पुनर्विवाह झाला होता. बेलतरोडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घरात दरवाजा बंद करून ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. दिवाळीनिमित्त नातेवाईक घरी भेटण्यासाठी आले असता घटना उघडकीस आली.

साखळी अपघात : बेस्ट बसची वाहनांना धडक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

पाच जण जखमी, दोन कारचा चक्काचूर



मुंबई – मुंबईत बेस्ट बसच्या अपघाताचे सत्र सुरूच आहे. वडाळा येथील भक्ती पार्क सिग्नलवर सोमवारी रात्री बेस्ट बसने खासगी बसने वाहनांना जोरदार धडक दिल्याने भीषण साखळी अपघात घडला.

या अपघातात दोन कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, त्यापैकी एक कार बेस्ट बसच्या मागील भागाखालीच घुसली. या दुर्घटनेत पाच जण जखमी झाले असून एका पाळीव कुत्र्यालाही दुखापत झाली आहे. जखमींपैकी काहींना सायन तर दोघांना सोमय्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. सोमवारी रात्री सुमारे ९ वाजताच्या सुमारास भक्ती पार्क सिग्नल येथे हा अपघात झाला. कुलाबा आगारातून गावणगावच्या दिशेने जाणारी बेस्टची बस (एमएच ०१ सीआर ३०१४) सिग्नलवर थांबली होती. तिच्या मागे दोन कारही सिग्नल सुटण्याची प्रतीक्षा करत उभ्या होत्या. त्याचवेळी मागून भरधाव आलेल्या 'चलो' या कंत्राटी बेस्ट बसने सर्वात मागील कारला जोरदार धडक दिली.

ओव्हरटेक केल्याचा राग : पुणे-नाशिक महामार्गावर

एमएसआरटीसी बस अडवून चालकाला मारहाण, व्हिडीओ व्हायरल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



पुणे – ओव्हरटेक केल्याच्या कारणावरून दोन दुचाकीस्वारांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसचा पाठलाग करून ती महामार्गावर अडवल्याची घटना समोर आली आहे.

सोमवारी दुपारी चाकणजवळ पुणे-नाशिक महामार्गावर हा प्रकार घडला. यावेळी दोघांनी बसचालकाला मारहाण केली, तसेच बसमधील प्रवाशांनाही धमकावले. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बस नाशिकच्या दिशेने जात असताना दोन दुचाकीस्वारांनी बसने ओव्हरटेक केल्यावर आक्षेप घेतला. त्यानंतर त्यांनी वेगवेगळ्या दुचाकींवरून बसचा पाठलाग केला आणि महामार्गावर बस थांबवण्यास भाग पाडले. बस थांबल्यानंतर दोघांनी चालकाला मारहाण केली. तसेच बसवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत प्रवाशांना धमकावले. त्यावेळी बसमध्ये दिवाळीच्या सुट्ट्यांसाठी गावी जाणारे अनेक प्रवासी होते. प्रवाशांनी संशयितांना आपल्याला जाऊ देण्याची विनंती केली, मात्र त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याची माहिती आहे.

महापालिकेच्या विधी खात्यातील ३५ पदांना कात्री! अनावश्यक पदे कायमची रद्द

२५ नवीन पदांची भर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – मुंबई महापालिकेच्या विधी खात्यातील कामकाज अधिक कार्यक्षम आणि सुसूत्र करण्याच्या उद्देशाने प्रशासनाने आस्थापना आकृतिबंधात मोठे फेरबदल करण्याचा निर्णय घेतला आहे.


या फेरबदलांतर्गत विधी खात्यातील विविध संवर्गांतील तब्बल ३५ पदे कायमस्वरूपी रद्द करण्यात येणार आहेत. त्याचवेळी नव्या कामकाजाच्या गरजेनुसार २५ पदांची नव्याने निर्मिती करण्यात येणार आहे. त्यामुळे विधी खात्यातील पदरचनेची पुनर्रचना होणार आहे. महापालिकेच्या विधी खात्याच्या आस्थापनेवर कायदा अधिकारी, वरिष्ठ विधी सहायक, लिपिक, हमाल आदी विविध संवर्गांतील एकूण ३५५ पदे आहेत.

मात्र, या पदरचनेत सुसूत्रता आणताना काही पदांची आवश्यकता नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे अनावश्यक पदे कमी करून आवश्यक पदांची नव्याने निर्मिती करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

दिवाळीच्या दिवशी राज्यभर आगींचा भडका! नागपूर शहरात फटाक्यांच्या आतिषबाजीमुळे ४३ ठिकाणी आग

टीवीएस शोरुमच्या आगीत ४५ दुचाकी जळून खाक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नागपूर – राज्यभरात दिवाळीचा सर्वत्र मोठा उत्साह बघायला मिळत असताना, काल म्हणजेच रविवारी लक्ष्मीपूजनाच्या सणाला राज्याच्या अनेक शहारांमध्ये आगींच्या घटना घडल्या आहेत.

यात कुठे फटाक्यांमुळे तर कुठे शॉर्ट सर्किटमुळे आग लागून मोठी वित्तहानी झाल्याची माहिती आहे. अशातच फटाक्यांच्या आतिषबाजी नागपूर शहरात ४३ ठिकाणी आग लागल्याच्या घटना घडल्या आहेत. यात तीन आगीच्या घटना मोठ्या स्वरूपाच्या असल्याची माहिती आहे. ज्यामध्ये देवनगर भागातील टीव्हीएसच्या शोरूमला लागलेल्या आगीत जवजवळ ४५ गाड्या जळाल्याची घटना घडली आहे. तर नागपुरातील मेडिकल चौक परिसरात एका इमारतीत वरच्या मजल्यावर आग लागल्याने एकच गोंधळ उडालाय. तळमजल्यावर अंकुश किराणा स्टोअर्स असून त्याच्यावरील मजल्यावर ही आग लागली. या सोबतच शहरात इतरत्र देखील आगीच्या घटनेत नुकसान झालं आहे. नागपुरात दिवाळीच्या रात्री टीवीएस शोरुमला आग, गाड्या जळून खाक दिवाळीच्या रात्री मोठ्या आगीची दूसरी घटना घडली आहे. यात नागपुरातील मेडिकल चौक परिसरात एका इमारतीत वरच्या मजल्यावर आग लागल्याने एकच गोंधळ उडालाय. तळमजल्यावर अंकुश किराणा स्टोअर्स असून त्याच्यावरील मजल्यावर ही आग लागली.

रणबीर कपूरच्या रामायणची ऑस्करच्या शर्यतीत एंट्री?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – बॉलीवूडचे ख्यातनाम आणि अत्यंत प्रतिभावान दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या बहुप्रतिक्षित व महाकाय बजेटच्या दोन-भागातील भव्य दिव्य महाकाव्य 'रामायण: भाग १' या चित्रपटाबाबत एक अत्यंत मोठी, रंजक आणि भारतीयांसाठी अतिशय अभिमानास्पद बातमी समोर आली आहे.

हा बहुचर्चित चित्रपट आगामी ९९व्या अकादमी पुरस्कारांसाठी (ऑस्कर २०२७) विचारात घेण्यासाठी अधिकृतपणे सादर करण्यात आला आहे.

